# साईकृपा को-ऑप. हौसिंग सोसायटी लि.

नोंदणी क्रमांक : एनबिओएम/सिडको/एचएसजी (ओएच) ७५०/जीटीआर सन - १९९८-९९

ए.टाईप कंडोमिनीयम नं-६, सेक्टर-९, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४००७०९


संदर्भ क्र.- साई/२५/२५ दिनांक- 11/10/2025

## स व्वीसांवी वार्षिक सर्व साधारण सभेचा इतिवृत्तांत दिनांक २८/०९/२०२५

**साई कृपा सहकारी गृहनिर्माण संस्थेची सव्वीसांव्वी वार्षिक सर्वसाधारण सभा सकाळी ठीक १०.३० वा. सुरू करण्यात आली, परंतु गणसंख्या अभावी सभा तहकूब करून पुन्हा त्याच ठिकाणी ठीक ११.०० वा. ५० सभासदांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आली.**

**सभेचे विषय:-**

**१) सभेसाठी तात्पुरत्या अध्यक्षांची निवड करणे –**

सचिव श्री. कुणाल मसणे यांनी सुचविल्या प्रमाणे श्री. निलेश चौधरी यांची सभेसाठी अध्यक्ष म्हणून नेमणूक करण्यात आली, व पुढील सभेचा कार्यभार अध्यक्षांनी स्वीकारला.

सूचक –श्री. कुणाला मसणे
अनुमोदन –श्री. विजय वाडकर व श्री शिवाजी ताजणे.

**२) मागील सभेचे इतिवृत्त मंजूर करणे –**

श्री. कुणाल मसणे यांनी मागील सभेचा इतिवृत्तांत वाचन करण्याचे, सर्व सभासदांकडून मंजुरी घेत असतांना, सर्व सभासदांनी एकमताने सुचवले की, मागील सभेचा इतिवृत्तांत हा सर्वांच्या घरों घरी पोहच केलेला आहे, त्यामुळे त्याचे वाचन करण्यात येऊ नये, व समितीने पुढील महत्वाचे विषय घ्यावेत.

सूचक –श्री. नवनाथ वाघुले.
अनुमोदन –श्री. मनोहर चव्हाण

**३) सन २०२४ व २०२५ या वर्षाचे व्यवस्थापकीय समितीने तैयार केलेले खर्च पत्रक व ताळेबंद पत्रक मंजूर करणेबाबत –**

खजिनदार श्री. महेंद्र पडवणकर यांनी २०२४–२५ या वर्षाचे जमाखर्च वाचन केले, व त्यावर सभासदांना काही प्रश्न आहेत का? अशी विचारणा करण्यात आली.

त्यावर श्री. सचिन वाक्कर यांच्याकडून विचारणा करण्यात आली की, जो जमा खर्च मांडला आहे तो ऑडिटर कडून मंजूर करण्यात आलेला आहे का?

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
नोंदणी क्रमांक : एनबीओएम/सिडको/एचएसजी (ओएच)/७५०/जेटीआर/ सन १९९९
नवी मुंबई-४०० ७०९

त्यावर अध्यक्षांकडून उत्तर देण्यात आले की,By-laws नुसार ऑडिटरची नेमणूक ही फक्तं वार्षिक सर्वसाधारण सभेत केलेली असावी, परंतु नवीन समितीचा पदभार हा में २०२४ मध्ये स्वीकारला गेल्यामुळे, मागील समितीने जो ऑडिटर नेमणूक केला होता, त्यांचीच २०२४-२५ साठी नेमणूक ही नवीन समितीचा पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्या सर्वसाधारण सभेत करण्यात आली होती. परंतु ही नेमणूक वार्षिक सर्वसाधारण सभेत झाली नसल्या कारणामुळे, आपण उप-निबंधक कार्यालय (सिडको) यांना २०२४-२५ साठीची ऑडिटरची नेमणूक, उप-निबंधक कार्यालयाकडून करण्यात यावी, असा विनंती अर्ज दिलेला आहे. ऑडिटर नेमणुकीनंतर प्रमाणित ऑडिट रिपोर्ट हा सर्वांच्या घरपोच देऊन, तो पुढील सभेत मंजूर करण्यात येईल.

सूचक-श्री. निलेश चौधरी
अनुमोदन -श्री. संदीप पावसकर

श्री. लक्ष्मण झोडगे यांनी रिपेअर फंड या विषयावर चर्चा करण्यात यावी, व संस्थेनि मागील सर्वसाधारण सभेत घेण्यात आलेले निर्णय हे कुठवर आलेत अथवा त्यावर काय अंमलबजावणी झाली अशी विचारणा केली, त्यावर अध्यक्षांनी माहिती दिली की, सदर विषयाबाबत आर्किटेक्ट कडून रिपेअर फंड सर्टिफिकेट प्राप्त करून त्यानुसार तो पावतीमध्ये आकारण्यात येईल.

सन २०२४-२५ चे वार्षिक ताळेबंदाचे खजिनदार श्री. महेंद्र पडवणकर यांनी वाचन केले, त्यावर श्री. सचिन वाक्कर यांनी संस्थेच्या २३-२४ व २४-२५ यातील खर्चामध्ये ७५,०००/-रुपयांची बचत केल्याबद्दल समितीची प्रशंसा केली. अन्य कुठल्याही प्रकारचे प्रश्न विचारण्यात आलेले नाही.सन २०२४-२५च्या ताळेबंदला एकमताने मंजुरी देण्यात आली.

सूचक-श्री विलास बडेकर
अनुमोदन -श्री. विजयराज निसाळ

**४) सन २०२५-२६ साठी लेखापरीक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे -**

अध्यक्ष श्री. निलेश चौधरी यांनी **श्री. शशिकांत चौधरी (पॅनल न.१४२४४/बी -२)** यांची २०२५-२६ साठी लेखापरीक्षक म्हणून निवडकरण्याबाबत सुचविले, यावर सर्वांनुमत्ते मंजुरी देण्यात आली.

सूचक -श्री. दयाघन हिंदळेकर
अनुमोदन -मनोहर चव्हाण

**५) सन २०२४-२५ या कालावधीत सोसायटीच्या नवीन झालेल्या सभासदांना मंजुरी देणे, तसेच यापुढे वेळोवेळी संस्थेमधील सभासदांचे राजीनामे स्वीकारणे व नवीन सभासदांना दाखल करून घेणे, याचे सर्व अधिकार सर्वांनुमत्ते व्यवस्थापकीय समितीला देण्याचे मंजूर करण्यात आले.**

सूचक -श्री. निलेश चौधरी
अनुमोदन -श्री.शिवाजी ताजणे

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
नोंदणी क्रमांक :
एनबीओएम/सिडको/
एचएसजी (ओएच)/७५०/
जेटीआर/सन १९९९
नवी मुंबई-४०० ७०१

**६) आयत्या वेळेस येणाऱ्या विषयांवर चर्चा करण्याबाबत –**

अध्यक्षांनी सूचित केले की, आपल्या संस्थेचे सभासद श्रीमती कुसुम धांडोरे यांची सदनिका क्र. ए १/१:१ यात नुकतीच छताची पडझड झालेली आहे, तरी यावर नवी मुंबई महानगरपालिके तर्फे पंचनामा करण्यात आलेला आहे, व त्यानुसार नवी मुंबई महानगरपालिके तर्फे महाराष्ट्र अधिनियम, १९४९कलम २६४(१) अन्वये धोकादायक इमारतीस दयावयाची नोटीस (जावक क्र.नमुनपा/ईविका/धो.इ.५३१६/२०२५, दिनांक १८/०९/२०२५)संस्थेला देण्यात आलेली आहे, त्यानुसार संस्थेला पुन्हा स्ट्रक्चरल ऑडिट करण्यास सांगितले आहे, त्यानुसार समितीने निविदा मागवल्या होत्या, प्राप्त ३ निविदा सर्व सभासदांन समोर मांडण्यात आल्या.

अ) बिल्ड केअर कन्सल्टंट –१,६२,५००/–
ब) एसपी कन्सल्टिंग –६०,०००/–
क) निर्माण प्रोजेक्ट्स –५०,०००/–
वरील निविदांपैकी छानणी करून निर्माण प्रोजेक्ट्स यांची नेमणूक सर्वांनुमत्ते करण्यात आली.

सूचक –श्री.मनोहर चव्हाण
अनुमोदन –श्री. प्रश्नांत यादव

१) वारंवार संस्थेमधील सभासदांच्या साफसफाईच्या तक्रारी नुसार, नवीन सफाई कर्मचाऱ्याचा नियुक्ती समितीनेच करावी, असे एकमताने मान्य करण्यात आले, समिती जो निर्णय घेईल तो सर्वांना मान्य असेल.

सूचक –श्री.संदीप पावसकर
अनुमोदन –श्री. प्रदीप बने व सौ. आरती शेट्टी.

२) लीस दीड करण्याबाबत–अध्यक्षांनी सदर मुद्द्यावर प्रकाश टाकत, मागील सर्व साधारण सभेत ठरल्या प्रमाणे पुढील महिन्यांपासून दरमहा ३,०००/–रु.असे पुढील ३ महिने भरणा पावती मध्ये आकारण्यात येतील, असे, सर्व सभासदांनसमोर मांडले. त्यावर सर्वांनुमत्ते मान्यता देण्यात आली.

सूचक –श्री. निलेश चौधरी
अनुमोदन –श्री. नवनाथ वाघुले

सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली, असे संबोधन करत सर्व सभासदांचे आभार मानून श्री. कुणाल मसणे यांनी सभेचा समारोप केला.

साईकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
नोंदणी क्रमांक : एनबीओएम/सिडको/एचएसजी (ओएच)/७५०/जेटीआर/सन १९९९
नवी मुंबई-४०० ७०९

For SAIKRUPA CO-OP. HSG. SOCIETY

Masane

(SECRETARY)